14 APR 2026

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शेती, उद्योगाविषयी डॉ. आंबेडकरांची भूमिका

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या आर्थिक विचारांत शेती आणि उद्योग यांचा परस्पर संबंध अत्यंत महत्त्वाचा मानला गेला आहे. भारतीय शेतीच्या समस्यांवर उपाय म्हणून औद्योगिक विकासाची गरज त्यांनी अधोरेखित केली असून त्याची प्रासंगिकता आजही कायम आहे.**

प्रा. डॉ. पी. एस. कांबळे

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे आंतरराष्ट्रीय ख्यातीचे अर्थशास्त्रज्ञ होते. त्यांचे सर्वाधिक शिक्षण अर्थशास्त्रातील असून ते शिक्षण अमेरिका आणि इंग्लंडमध्ये झाले आहे. त्यांचा एम.ए., पीएच.डी. आणि डी.एस्सी.साठीच्या संशोधनासाठी विषय अर्थशास्त्र हाच होता. हे अर्थशास्त्रातील संशोधन अमेरिका आणि इंग्लंडमधील विद्यापीठात झाले होते. बाबासाहेब धोरणकर्ते होते. ते १९४२ ते ४६ या कालावधीत कौन्सिल मंत्रिमंडळात श्रम, ऊर्जा आणि जल विभागाचे कॅबिनेट मंत्री होते. मंत्री म्हणून त्यांनी स्वातंत्र्यपूर्वकालीन विकास धोरण निश्चितीत आणि अंमलबजावणीत महत्त्वाचे योगदान दिले आहे. देशासमोरील आर्थिक आणि सामाजिक समस्याच त्यांचा संशोधनाचा विषय होता. असेच एक त्यांचे अत्यंत महत्त्वाचे संशोधन म्हणजे भारतीय शेतीच्या समस्या होय. बाबासाहेबांनी सांगितलेला उद्योग विकासातून शेती विकास हा उपाय आजही उपयोगी ठरू शकतो.

### शेती विकासासाठी औद्योगिक विकास

डॉ. आंबेडकरांचे शेती समस्यांविषयक विचार आणि उपाय आपणास त्यांच्या १९१८ मध्ये प्रसिद्ध झालेल्या 'स्मॉल होल्डिंग्ज इन इंडिया अँड देअर रेमेडीज' या निबंधात मिळतात. हा निबंध जर्नल ऑफ इंडियन इकॉनॉमिक सोसायटी या अत्यंत नामांकित आणि प्रसिद्ध अशा जर्नलमध्ये प्रसिद्ध झाला होता. त्यांच्या १९४७ मध्ये प्रसिद्ध झालेल्या 'स्टेटस् अँड मायनॉरिटीज' या ग्रंथात ते भारतीय शेतीचे महत्त्व, समस्या आणि ठोस उपाययोजना सुचवितात. डॉ. आंबेडकर यांच्या मते, शेती ही भारतासारख्या देशासाठी अत्यंत महत्त्वाची आहे. कारण शेतीच अन्नाची गरज भागवू शकते. उद्योगांचा विकास कच्च्या मालाशिवाय होऊ शकत नाही आणि शेती आवश्यक कच्चा माल पुरविते. प्राथमिक उद्योग विकासात शेतीचे योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे. मात्र दुर्दैवाने भारतीय शेतीपुढे समस्या असून त्याची व्याप्ती आणि तीव्रता अधिक आहे. भारतीय शेतीचे आकारमान अत्यंत लहान असून ते विखुरलेले आहे. आसाममध्ये शेतीचे सरासरी आकारमान ३.३७ एकर अत्यल्प असताना ते ३.३ एकरपर्यंत कमी झाले. तर मद्रासमध्ये सरासरी फक्त ७ एकरच राहिले. त्यानंतर डॉ. बाबासाहेब पुण्याजवळील पिंपळे सौदागर या खेड्यातही शेतीचे आकारमान किती अल्प आहे ते स्पष्ट करतात. त्यांच्या मते, १ ते २ एकर आकारमान असलेले १६४ शेतकरी, तर २० ते ३० गुंठे आकारमान असलेले १३६ शेतकरी होते. यावरून खेड्यात शेतीचे आकारमान किती लहान आहे ते स्पष्ट होते. त्यानंतर शेतीवरील अतिरिक्त अवलंबित्व त्यांनी स्पष्ट केले आहे. शेतीवर उदरनिर्वाहाचे साधन म्हणून अवलंबून असणाऱ्या लोकांचे प्रमाण ७१.५ टक्के एवढे आहे. भारतीय शेतीची उत्पादकता अत्यल्प असल्याचे ते सिद्ध करतात. कॅनडामध्ये दर एकरी उत्पादकता १७२३ किलो गहू आणि ३१९१ किलो मका आहे, तर ती भारतातील ५५५ आणि ७६६ अनुक्रमे एवढीच आहे. डॉ. आंबेडकर हे सांगतात की, शेतीच्या योग्य आर्थिक आकारमानाचा विचार केवळ मागणी किंवा प्राप्ती दृष्टिकोनातून न करता पुरवठ्याच्या बाजूने करायला पाहिजे. ज्यात उत्पादन घटकांच्या प्रमाणाचा आणि



वापराचा विचार गरजेचा आहे. दुर्दैवाने भारतात शेती अवजारे आणि प्राणी उपलब्धता आणि वापरही कमी झाला आहे.

डॉ. आंबेडकर यांनी काही उपायही सुचविले आहेत. मात्र त्यात त्यांनी सर्वाधिक महत्त्व औद्योगिक विकासास दिले आहे. त्यांच्या मते, औद्योगिक विकास हाच प्रभावी आणि सिद्ध उपाय आहे. जो अमेरिकेत सिद्धही झाला आहे आणि भारतात राबविणे अत्यावश्यक आहे. त्यासाठी भारताने औद्योगिकीकरणास प्राधान्य देऊन प्रामाणिक प्रयत्न करावा. त्यातून शेतीचा विकास होऊन देशाचाही विकास होईल. म्हणून भारताच्या शेती विकासासाठी औद्योगिक विकास अत्यावश्यक आहे. तोच अत्यंत खात्रीचा, सिद्ध आणि विश्वसनीय उपाय आहे. त्याबरोबरच शेतीला उद्योगाचा दर्जा द्यावा आणि तो सरकारी उद्योगाचा असेल तर अधिकच चांगले होईल. याबरोबरच शेतीचे एकत्रिकीकरण आणि तुकडेजोड करून आकारमान वाढवावे. शेतीतील अतिरिक्त मनुष्यबळ बिगर शेती रोजगारात गुंतविणे, शेती आदानांचा वापर वाढवणे हे उपायही सांगितले आहेत.

### भारताची वर्तमान विकास स्थिती

आजही भारत शेतीप्रधानच देश आहे. शेती हाच अर्थव्यवस्थेचा कणा आहे. आजही भारतीय शेती ६० टक्क्यांपेक्षा अधिक लोकसंख्येचे उदरनिर्वाहाचे साधन आहे. म्हणजेच बिगर शेती रोजगार निर्माण करण्यात आपण यशस्वी झालो नाही, कारण उद्योग विकासाचा केंद्रबिंदू शहरी भागच राहिला. त्यातच शेतीतील रोजगार हंगामी असून त्यातील स्त्रियांचा सहभाग अधिक आहे. मात्र स्त्री आणि पुरुष यांच्या वेतनदरात खूपच फरक आहे. सुरुवातीच्या काळात शेतीचा वाटा देशाच्या स्थूल देशांतर्गत उत्पादनात ५० टक्क्यांपेक्षा अधिक होता तो आज २० टक्क्यांपेक्षाही कमी आहे. शेतीवरील उदरनिर्वाहाचे साधन म्हणून आपले अवलंबित्व फारसे कमी झालेले नाही. देशातील शेतीत सार्वजनिक गुंतवणूक सातत्याने कमी होत आहे आणि खासगी गुंतवणूक अल्प असून होणारी भांडवल निर्मितीही अल्पच आहे. आजही भारतीय शेती मान्सूनवरील जुगारच आहे. आवश्यक जलसिंचन सुविधा निर्माण करण्यात आपण यशस्वी झालो नाही. भारतीय शेतीची उत्पादकता तुलनेने कमीच आहे, जरी देशात हरितक्रांती झालेली असली तरी.

### वर्तमानकालीन उपयुक्तता

सर्वप्रथम बाबासाहेबांनी सांगितल्याप्रमाणे शेतीला उद्योगाचा दर्जा देणे अत्यावश्यक आहे. शेतीस सरकारी मालकीच्या उद्योगाचा दर्जा दिला तर ते अधिकच उत्तम होईल. सामुदायिक आणि सहकारी शेतीचा अवलंब करणे अत्यावश्यक आहे. उद्योगांचा विकास अग्रक्रमाने करणे अत्यावश्यक असून त्याचवेळेला शेतीतील अतिरिक्त लोकसंख्या बाहेर काढून औद्योगिक रोजगारात समाविष्ट करावी लागेल. आज शेतीचे आकारमान अत्यंत कमी होत असून जमिनीचा बिगर शेती वापर खूपच वाढत आहे. ते शेती विकासास अडथळा ठरत आहे. शेतीच्या आकारमानाकडे पाहताना सिंचन सुविधा, अवजारे इत्यादी गोष्टींकडे लक्ष देणे आवश्यक आहे. देशाचे शेती, औद्योगिक आणि आर्थिक विकास धोरण तयार करून प्रामाणिकपणे राबविल्यास भारतीय शेतीचा आणि अर्थव्यवस्थेचा सर्वांगीण विकास निश्चितच होईल असे वाटते.

14 APR 2026
पुढारी

# आर्थिक साक्षरता काळाची गरज : डॉ. शिंदे

**कोल्हापूर :** आर्थिक साक्षरता काळाची गरज बनत चालली आहे, असे प्रतिपादन कर्मवीर हिरे महाविद्यालय, गारगोटीचे प्राचार्य डॉ. उदयकुमार शिंदे यांनी व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठाच्या हिंदी विभागात आयोजित 'नव उद्योजक आणि स्टार्टअपसाठी आर्थिक साक्षरता' विषयावर विशेष व्याख्यान झाले. त्यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी हिंदी विभागाच्या विभाग प्रमुख तृप्ती करेकट्टी होत्या. डॉ. शिंदे म्हणाले, जीवनामध्ये स्थैर्य पाहिजे असेल तर उत्पन्नाचे एकापेक्षा जास्त मार्ग असले पाहिजेत. त्याचबरोबर खर्चाचा ५०-३०-२० चा फॉर्म्युला वापरला पाहिजे. प्रास्ताविक डॉ. हर्षवर्धन पंडित यांनी केले. सूत्रसंचालन श्रीकांत देसाई यांनी केले. स्वागत डॉ. प्रकाश निकम यांनी केले. डॉ. जयसिंग कांबळे यांनी आभार मानले.

14 APR 2026

पुढारी

## संक्षिप्त

# कॉपीमुक्त अभियान विद्यार्थ्यांच्या सहभागातूनच यशस्वी होईल : अडगळे

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ संलग्नित महाविद्यालयांतील परीक्षा सुरू आहेत. विद्यार्थांच्या सहभागातूनच कॉपीमुक्त अभियान यशस्वी होईल, असे मत परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे उपकुलसचिव दीपक अडगळे यांनी व्यक्त केले. शिवाजी विद्यापीठ दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र व सांगली, सातारा विभागीय केंद्रातर्फे अभ्यासकेंद्र समन्वयक, विद्यार्थ्यांसाठी आयोजित 'कॉपीमुक्त अभियान : एक चळवळ' या विषयावरील ऑनलाईन विशेष व्याख्यानात ते बोलत होते. दूरशिक्षण केंद्राचे संचालक डॉ. कृष्णा पाटील, उपकुलसचिव विनय शिंदे उपस्थित होते. अडगळे म्हणाले, महाविद्यालयीन परीक्षा काळात कॉपी किंवा तत्सम कोणतेही गैरप्रकार होऊ नयेत यासाठी केंद्रप्रमुख, कनिष्ठ व वरिष्ठ पर्यवेक्षक तसेच विद्यार्थ्यांनी नियमांची काटेकोर अंमलबजावणी करणे अत्यावश्यक आहे. परीक्षेदरम्यान गैरप्रकार करणाऱ्यांवर भरारी पथकाकडून कडक कारवाई केली जाईल व परीक्षा प्रमाद समितीच्या शिक्षेस सामोरे जावे लागेल, असा इशाराही त्यांनी दिला. सातारा विभागीय केंद्राचे समन्वयक डॉ. सूर्यकांत गायकवाड यांनी प्रास्ताविक केले. डॉ. नितीन रणदिवे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. चांगदेव बंडगर यांनी आभार मानले.



1 4 APR 2026

लोकमत

# कॉपीमुक्त अभियान विद्यार्थ्यांच्या सहभागातूनच यशस्वी : अडगळे

कोल्हापूर : विद्यार्थ्यांनी कॉपीमुक्त अभियान यशस्वी करण्यासाठी सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे उपकुलसचिव दीपक अडगळे यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण व ऑनलाइन शिक्षण केंद्र तसेच सांगली, सातारा विभागीय केंद्रातर्फे सोमवारी अभ्यास केंद्र समन्वयक व विद्यार्थ्यांसाठी आयोजित 'कॉपीमुक्त अभियान : एक चळवळ' या विषयावरील ऑनलाइन विशेष व्याख्यानात ते बोलत होते. यावेळी डॉ. कृष्णा पाटील, विनय शिंदे उपस्थित होते. यावेळी विद्यार्थ्यांनी विचारलेल्या प्रश्नांना अडगळे आणि डॉ. पाटील यांनी उत्तरे दिली. डॉ. सूर्यकांत गायकवाड यांनी प्रास्ताविक केले.

14 APR 2026

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

परीक्षा मूल्यमापन मंडळाचे उपकुलसचिव दीपक अडगळे यांचे आवाहन


# कॉपीमुक्त अभियानात विद्यार्थ्यांचा सहभाग आवश्यक

**प्रतिनिधी, कोल्हापूर**

शिवाजी विद्यापीठाच्या संलग्नित महाविद्यालयांतील परीक्षा निकोप, पारदर्शक व विश्वासार्ह वातावरणात पार पडण्यासाठी विद्यार्थ्यांनी कॉपीमुक्त अभियान यशस्वी करण्यासाठी सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे उपकुलसचिव दीपक अडगळे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र तसेच सांगली व सातारा विभागीय केंद्राच्यावतीने अभ्यासकेंद्र समन्वयक व विद्यार्थ्यांसाठी आयोजित 'कॉपीमुक्त अभियान : एक चळवळ" या विषयावरील ऑनलाइन विशेष व्याख्यानात ते बोलत होते.

या कार्यक्रमास दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राचे संचालक डॉ. कृष्णा पाटील, उपकुलसचिव विनय शिंदे, समन्वयक, सहायक प्राध्यापक, विद्यार्थी ऑनलाइन उपस्थित होते.



अडगळे म्हणाले की, महाविद्यालयीन परीक्षा काळात कॉपी किंवा तत्सम कोणतेही गैरप्रकार होऊ नयेत, यासाठी केंद्रप्रमुख, कनिष्ठ व वरिष्ठ पर्यवेक्षक तसेच विद्यार्थ्यांनी नियमांची काटेकोर अंमलबजावणी करणे अत्यावश्यक आहे. परीक्षेदरम्यान गैरप्रकार करणाऱ्यांवर भरारी पथकाकडून कडक कारवाई केली जाईल व परीक्षा प्रमाद समितीच्या शिक्षेस सामोरे जावे लागेल, असा इशाराही त्यांनी दिला. विद्यार्थ्यांमधील कॉपी करण्याची प्रवृत्ती नष्ट करून विद्यापीठाच्या परीक्षांची विश्वासार्हता वाढविण्यासाठी सर्वांनी एकत्रितपणे कॉपीमुक्त अभियानात सहभागी व्हावे, असेही त्यांनी नमूद केले.

यावेळी संचालक डॉ. कृष्णा पाटील यांनी 'परीक्षेला सामोरे जाताना' विषयावर मार्गदर्शन केले. नियोजनबद्ध अभ्यास, पुनरावृत्ती व लेखन सराव, मानसिक तयारी, आरोग्य व एकाग्रता, तसेच शिस्त व नैतिकता. 'कॉपी ही यशाची वाट नसून ती आत्मविश्वास हरविण्याची सुरुवात आहे,'. असे त्यांनी सांगितले.

स्वागत सातारा विभागीय केंद्राचे समन्वयक डॉ. सूर्यकांत गायकवाड यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. नितीन रणदिवे यांनी केले. आभार डॉ. चांगदेव बंडगर यांनी मानले.

1 4 APR 2026

जनप्रवास



शिवाजी विद्यापीठात फुले-शाहू-आंबेडकर सप्ताहांतर्गत आयोजित विशेष परिसंवादात बोलताना डॉ. गिरीष मोरे. सोबत अविनाश भाले, अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख आणि डॉ. प्रकाश कांबळे.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे भारतीय विकासनीतीचे धोरणकर्ते

## • शिवाजी विद्यापीठातील परिसंवादात सूर

**जनप्रवास : कोल्हापूर**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे खऱ्या अर्थाने भारतीय विकासनितीचे धोरणकर्ते होते, असा सूर आज शिवाजी विद्यापीठात फुले-शाहू-आंबेडकर सप्ताहानिमित्त आयोजित परिसंवादात उमटला. सप्ताहांतर्गत आज डॉ. प्रकाश कांबळे यांच्या "वर्तमान उपयुक्त अर्थशास्त्रज्ञ डॉ. बाबासाहेब आंबेडकर" या पुस्तकावर विशेष परिसंवाद रंगला.

ज्येष्ठ विचारवंत डॉ. गिरीष मोरे आणि सामाजिक समावेशन अभ्यास केंद्राचे सहायक संचालक अविनाश भाले यांनी सहभाग घेतला. अध्यक्षस्थानी मानव्यशास्त्र विद्याशाखेचे प्रभारी अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख होते, तर लेखक डॉ. कांबळे यांची प्रमुख उपस्थिती होती.

डॉ. गिरीष मोरे म्हणाले, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान केवळ सामाजिक किंवा राज्यघटनात्मक क्षेत्रापुरते मर्यादित नसून त्यांनी भारताच्या आर्थिक विकासासाठी ठोस आणि दूरदर्शी धोरणांचा आराखडा तयार केला. या पार्श्वभूमीवर कांबळे यांच्या पुस्तकाने आंबेडकरांच्या आर्थिक विचारांना समकालीन संदर्भ दिला आहे.

सहायक संचालक अविनाश भाले म्हणाले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या आर्थिक विचारांचे इतक्या सोप्या आणि सर्वसामान्यांना समजेल अशा भाषेत केलेले सादरीकरण हे या ग्रंथाचे मोठे वैशिष्ट्य आहे. शेती व औद्योगिक विकासाचा परस्परसंबंध, संशोधनातील बाबासाहेबांची प्रागतिक दृष्टी, 'लोकल टू ग्लोबल' असा व्यापक दृष्टिकोन आणि आजच्या धोरणांशी साधलेली सांगड हे या पुस्तकाचे महत्त्वपूर्ण पैलू असल्याचे त्यांनी नमूद केले.

लेखक डॉ. प्रकाश कांबळे म्हणाले की, बाबासाहेबांचे अर्थशास्त्रीय संशोधन, भारताच्या नियोजन प्रक्रियेतले योगदान, वित्तीय समतोल, चलनव्यवस्था, रिझर्व्ह बँकेची संकल्पना, तसेच शेती व औद्योगिक विकासाचा समन्वय या सर्व बाबी आजच्या समस्यांवरही प्रभावी उपाय सुचवतात, असे त्यांनी स्पष्ट केले. डॉ. महादेव देशमुख म्हणाले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अर्थशास्त्रीय विचारांची सुस्पष्ट, संक्षिप्त आणि संदर्भाधारित मांडणी हे या ग्रंथाचे वैशिष्ट्य आहे. यावेळी डॉ. तेजपाल मोहरेकर यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. सिद्धांत माने यांनी सूत्रसंचालन केले, तर डॉ. किशोर खिलारे यांनी आभार मानले. कार्यक्रमाला प्राचार्य डॉ. हरिष भालेराव, डॉ. एल.एन. घाटगे, ए.बी. कांबळे, आनंद खामकर यांच्यासह शिक्षक, प्रशासकीय कर्मचारी आणि विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

14 APR 2026

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# डॉ. आंबेडकर हे भारतीय विकासनीतीचे धोरणकर्ते

## शिवाजी विद्यापीठातील परिसंवादात सूर

कोल्हापूर : प्रतिनिधी

**भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे खऱ्या अर्थाने भारतीय विकासनीतीचे धोरणकर्ते होते, असा सूर सोमवारी शिवाजी विद्यापीठात फुले-शाहू-आंबेडकर सप्ताहानिमित्त आयोजित परिसंवादात उमटला. सप्ताहांतर्गत डॉ. प्रकाश कांबळे यांच्या 'वर्तमान उपयुक्त अर्थशास्त्रज्ञ डॉ. बाबासाहेब आंबेडकर' या पुस्तकावर विशेष परिसंवाद रंगला.**

ज्येष्ठ विचारवंत डॉ. गिरीश मोरे म्हणाले, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान केवळ सामाजिक किंवा राज्यघटनात्मक क्षेत्रापुरते मर्यादित नसून त्यांनी भारताच्या आर्थिक विकासासाठी ठोस आणि दूरदर्शी धोरणांचा आराखडा तयार केला. या पार्श्वभूमीवर कांबळे यांच्या पुस्तकाने आंबेडकरांच्या आर्थिक विचारांना समकालीन संदर्भ दिला आहे. आंबेडकरांच्या विकासनीतीत शेती आणि उद्योग यांच्यातील समतोलाला विशेष महत्त्व दिले होते. शेतीतील अतिरिक्त



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात फुले-शाहू-आंबेडकर सप्ताहांतर्गत आयोजित विशेष परिसंवादात बोलताना डॉ. गिरीश मोरे.**

मनुष्यबळ औद्योगिक क्षेत्रात वळवून उत्पादन क्षमतेत वाढ साधण्याचा त्यांचा दृष्टिकोन होता. यामुळे ग्रामीण व शहरी अर्थव्यवस्थेतील दरी कमी होऊन व्यापक आर्थिक प्रगती साधता येते, असे त्यांनी स्पष्ट केले. सामाजिक समावेशन अभ्यास केंद्राचे सहायक संचालक अविनाश भाले म्हणाले, विशेषतः शेती व औद्योगिक विकासाचा परस्पर संबंध, संशोधनातील बाबासाहेबांची प्रागतिक दृष्टी, 'लोकल टू ग्लोबल' असा व्यापक दृष्टिकोन आणि आजच्या धोरणांशी साधलेली सांगड हे या पुस्तकाचे महत्त्वपूर्ण पैलू असल्याचे त्यांनी नमूद केले. लेखक डॉ. प्रकाश कांबळे म्हणाले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या व्यक्तिमत्त्वातील अर्थशास्त्रज्ञ हा महत्त्वाचा पैलू समाज आणि अभ्यासकांकडून मोठ्या प्रमाणावर दुर्लक्षित राहिला असून, तो सर्वांपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने हे पुस्तक लिहिले. बाबासाहेबांचे अर्थशास्त्रीय संशोधन, भारताच्या नियोजन प्रक्रियेतले योगदान, वित्तीय समतोल, चलन व्यवस्था, रिझर्व्ह बँकेची संकल्पना, तसेच शेती व औद्योगिक विकासाचा समन्वय या सर्व बाबी आजच्या समस्यांवरही प्रभावी उपाय सुचवतात, असे त्यांनी स्पष्ट केले.

अध्यक्षीय मनोगतात डॉ. महादेव देशमुख म्हणाले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अर्थशास्त्रीय विचारांची सुस्पष्ट, संक्षिप्त आणि संदर्भाधारित मांडणी हे या ग्रंथाचे वैशिष्ट्य आहे. अवघ्या १५२ पृष्ठांच्या या पुस्तकात २५ प्रकरणांद्वारे आंबेडकरांचे व्यापक आर्थिक तत्त्वज्ञान प्रभावीपणे उलगडले असून, संशोधनासाठी केवळ समस्या मांडण्यापेक्षा तिचे उपाय सुचवण्याची बाबासाहेबांची दृष्टी विशेष अधोरेखित होते. प्रास्ताविक डॉ. तेजपाल मोहरेकर, सूत्रसंचालन सिद्धांत माने यांनी केले. डॉ. किशोर खिलारे यांनी आभार मानले. प्राचार्य डॉ. हरिश भालेराव, डॉ. एल. एन. घाटगे, ए. बी. कांबळे, आनंद खामकर आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

14 APR 2026 लोकमत

# स्वप्नाली मगदूमने विकसित केली महापुराचे व्यवस्थापन करणारी प्रणाली

## 'यंग स्कॉलर' स्पर्धेत देशात प्रथम : अमेरिकेत प्रतिनिधित्व

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील भूगोल विभागातील एम.एस्सी. जिओइन्फॉर्मेटिक्स प्रथम वर्षात शिकणाऱ्या स्वप्नाली मगदूम जुलै महिन्यात सॅन डिएगो, कॅलिफोर्निया (अमेरिका) येथे होणाऱ्या 'ग्लोबल एसरी यूझर कॉन्फरन्स'मध्ये जागतिक व्यासपीठावर भारताचे प्रतिनिधित्व करणार आहे. तिने जीआयएस क्षेत्रातील जगातील सर्वात मोठी संस्था असलेल्या 'एसरी'च्या भारतीय शाखेतर्फे आयोजित 'यंग स्कॉलर' स्पर्धेत देशातून प्रथम क्रमांक मिळवला आहे.



> जगातील निवडक ७० स्कॉलर्समध्ये स्थान मिळवून ग्रामीण भागातील विद्यार्थिनीने थेट अमेरिकेतील परिषदेमध्ये स्थान प्राप्त करणे, ही बाब शिवाजी विद्यापीठासह महाराष्ट्रासाठी अभिमानास्पद आहे.
>
> **डॉ. सुरेश गोसावी**, प्रभारी कुलगुरू

'एसरी'तर्फे दरवर्षी जगभरातील विविध देशांमधून प्रत्येकी एका गुणवंत विद्यार्थ्याची 'यंग स्कॉलर' म्हणून निवड केली जाते. २०२६ वर्षासाठी जगभरातून निवडल्या गेलेल्या अशा ७० तरुण संशोधकांमध्ये स्वप्नालीने राष्ट्रीय स्तरावर बाजी मारली आहे. त्यामुळे तिला अमेरिकेत होणाऱ्या परिषदेत सहभागी होण्याचे अधिकृत आमंत्रण मिळाले आहे. तिने 'स्मार्ट फ्लडगार्ड : मोबाईल ॲण्ड आयओटी बेस्ड रिअल टाइम फ्लॅश फ्लड मॉनिटरिंग, अर्ली वॉर्निंग ॲण्ड इव्हॅक्युशिन सिस्टम' या विषयावर संशोधन सादर केले होते. अचानक येणाऱ्या महापुराचे रिअल टाइम मॉनिटरिंग करणे, त्याबद्दल पूर्वसूचना देणे आणि आपत्ती काळात सुरक्षित बाहेर पडण्यासाठी मार्ग सुचवणे, अशी अत्याधुनिक यंत्रणा तिने विकसित केली आहे. मोबाइल ॲप आणि आयओटी तंत्रज्ञानाचा वापर करून बनवलेली ही प्रणाली आपत्ती व्यवस्थापनासाठी मैलाचा दगड ठरणार आहे.

तिला भूगोल विभागप्रमुख डॉ. सचिन पन्हाळकर, डॉ. अभिजित पाटील, डॉ. प्रशांत पाटील, डॉ. विद्या चौगुले, डॉ. सुधीर पवार आणि शुभम गिरीगोसावी यांचे तांत्रिक व शैक्षणिक मार्गदर्शन लाभले. तिने आधुनिक जिओस्पॅशिअल तंत्रज्ञानाचा वापर करून हा प्रकल्प यशस्वीरीत्या पूर्ण केला.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

14 APR 2026

जनप्रवास

# फुलेंचा सार्वजनिक सत्यधर्म हा मानवी स्वातंत्र्याचा जाहीरनामा

**जनप्रवास : कोल्हापूर**

महात्मा फुले यांनी स्थापन केलेला सार्वजनिक सत्यधर्म हा सामाजिक समतेच्या तत्त्वावर आधारलेला आहे. तो आचरण्यास विधायक व सुलभ आहे. धार्मिक सहिष्णूता, मानवी प्रतिष्ठा आणि मानवी समानता ही मूल्ये समाजात रुजविण्यासाठीच जोतीरावांनी या सार्वजनिक सत्यधर्माची निर्मिती केली होती. फुलेंचा हा 'सार्वजनिक सत्यधर्म' म्हणजे मानवी मुक्तीचा जाहीरनामा आहे, असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. जी. पी. माळी यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्राच्या वतीने सुरु असलेल्या फुले-शाहू-आंबेडकर सप्ताहांतर्गत

## • प्राचार्य डॉ. जी. पी. माळी यांचे प्रतिपादन

महात्मा फुले यांच्या १९९ व्या जयंतीनिमित्त आयोजित "महात्मा फुले यांचा मानवतावादी सत्यधर्म" या विषयावरील व्याखानामध्ये ते बोलत होते. यावेळी प्रभारी अधिष्ठाता प्रा. डॉ. एम. एस. देशमुख अध्यक्षस्थानी होते. प्रास्ताविक व स्वागत डॉ. विद्यानंद खंडागळे यांनी केले.

डॉ. माळी म्हणाले, सत्यशोधक समाज ते सार्वजनिक सत्यधर्म हा फुलेंच्या जीवन व कार्याचा प्रवास आहे. सार्वजनिक सत्यधर्म या ग्रंथामध्ये 'सत्यधर्माची' मुलभूत मांडणी केली आहे. 'सत्य' हेच जोतीरावांच्या धर्माचा पाया आहे, असे सांगितले. सूत्रसंचालन समीर होवाळ यांनी केले. अध्यक्षीय मनोगतात डॉ. एम. एस. देशमुख म्हणाले, महात्मा फुले हे समतेचे अग्रदूत होते. त्यांनी समाजातील सामाजिक व आर्थिक शोषणाविरुद्ध महत्त्वपूर्ण कार्य केले. प्रा. डॉ. प्रल्हाद माने यांनीही मनोगत व्यक्त केले. आभार डॉ. तेजपाल मोहरेकर यांनी मानले. व्याख्यानास प्राचार्य डॉ. हरीश भालेराव, डॉ. चेतना सोनकांबळे, प्रा. अविनाश भाले, आनंदराव खामकर, डॉ. आर. एम. गरुड, एम. के. भानारकर, प्रकाश श्रावस्ती, दीपक शिंदे, किशोर खिलारे, गणेश कांबळे, प्रा. प्रियांका जाधववर, मिलिंद सुरुळकर, उदय पोवार, सुशांत पंडित, विक्रम कांबळे उपस्थित होते.

14 APR 2026

पुढारी

# महात्मा फुलेंचा सार्वजनिक सत्यधर्म मानवी स्वातंत्र्याचा जाहीरनामा

## प्राचार्य डॉ. जी. पी. माळी यांचे प्रतिपादन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

महात्मा फुले यांनी धार्मिक सहिष्णुता, मानवी प्रतिष्ठा व मानवी समानता ही मूल्ये समाजात रुजविण्यासाठीच सार्वजनिक सत्यधर्माची निर्मिती केली. सार्वजनिक सत्यधर्म म्हणजे मानवी मुक्तीचा जाहीरनामा आहे, असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. जी. पी. माळी यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्राच्या वतीने सुरू असलेल्या फुले-शाहू-आंबेडकर सप्ताहांतर्गत महात्मा फुले यांच्या १९९ व्या जयंतीनिमित्त आयोजित 'महात्मा फुले यांचा मानवतावादी सत्यधर्म' या विषयावरील व्याख्यानामध्ये ते बोलत होते. प्रभारी अधिष्ठाता प्रा. डॉ. एम. एस. देशमुख अध्यक्षस्थानी होते.

डॉ. माळी म्हणाले, विद्यार्थ्यांनी महात्मा फुले यांचे विचार व कार्य समजून घेण्यासाठी वृत्तपत्रातील एखाद्या लेखावर अवलंबून न राहता फुलेंनी लिहिलेले मूळ ग्रंथ वाचून समजून घेतले पाहिजेत. अध्यक्षीय मनोगतात देशमुख म्हणाले, महात्मा फुले हे समतेचे अग्रदूत होते. त्यांनी समाजातील सामाजिक व आर्थिक शोषणाविरुद्ध महत्त्वपूर्ण कार्य केले.

प्रा. डॉ. प्रल्हाद माने यांनी मनोगत व्यक्त केले. डॉ. विद्यानंद खंडागळे यांनी प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन समीर होवाळ यांनी केले. डॉ. तेजपाल मोहरेकर यांनी आभार मानले. यावेळी प्राचार्य डॉ. हरीश भालेराव, डॉ. चेतना सोनकांबळे, प्रा. अविनाश भाले, आनंदराव खामकर, डॉ. आर. एम. गरुड, डॉ. किशोर खिलारे आदी उपस्थित होते.